**Estd 1962**

**Naac 'A++' Grade**

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# दि.२५/८/२०२२

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च/एप्रिल २०२२ उन्हाळी सत्राच्या एकुण **७४७** अभ्यासक्रमाच्या परीक्षापैकी विद्यापीठस्तरावरील **५६१** परीक्षांपैकी काही परीक्षांना दि.१९ जुलै २०२२ पासून एम.सी.क्यू.ऑफलाईन पध्दतीने सुरळीतपणे सुरवात झाली.

आज दि.२५ ऑगस्ट २०२२ रोजी B.Sc., B.A., MBA, M.A., B.Arch., M.Sc., B.Pharm., M.J., B.B.A., B.A.B.Ed., B.Ed.M.Ed (Integrated) इ. अभ्यासक्रमाच्या **१३** विषयाच्या परीक्षा पार पडल्या. आजच्या परीक्षेसाठी एकुण **६९३२** इतक्या विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.

या परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणा—या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. सदर पथकाकडून परीक्षेत गैरप्रकार करणा—या विद्यार्थ्यांवर गैरप्रकार म्हणून प्रत्यक्ष नोंद करुन परीक्षा प्रमाद समितीमार्फत नियमानुसार कारवाई विद्यापीठामार्फत करण्यात येणार आहे. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ.अजितसिंह जाधव यांनी केले.